" || जे का रंजले गांजले | त्यांसी करूया आपुले ||"

श्री शिवाजी शिक्षण संस्था कराड, उच्च शिक्षण मंडळ. कराडचे

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.



## मराठी विभाग

सन २०२३- २४

## मराठी भाषा गौरव दिन
व
## कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज जयंती

## कार्यक्रम पत्रिका

- प्रास्ताविक : प्रा. संतोष बोंगाळे (मराठी विभाग प्रमुख )
- पाहुण्यांचा परिचय : प्रा. वसीम आंबेकरी
- प्रमुख पाहुणे : प्रा. सौ. कांचन कृष्णत थोरात (सुप्रसिद्ध कवयित्री)
- अध्यक्ष : प्र. प्राचार्य श्रीमती डॉ. एस. आर. सरोदे
- आभार : प्रा. एस. के. महाले
- सूत्रसंचालन : श्रीमती. प्रा. ए. एम. मुजावर

---

मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४

वेळ- सकाळी ९. ०० वा.

स्थळ- ले. हॉ. क्र.२३ वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

प्रभारी प्राचार्य,
वेणूताई चव्हाण कॉलेज,
कराड

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

# मराठी भाषेचा गौरव करणे आपले कर्तव्य : प्रा. सौ. कांचन थोरात

**कराड : : हॅलो प्रभात**



मराठी भाषा दिन हा केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून जगभरातील मराठी भाषिकांकडून तो साजरा केला जातो. मराठी भाषा आपल्या समृद्ध साहित्यिक परंपरा आणि अर्थपूर्ण बारकाव्यांसह, देशाच्या भाषिक वारशात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. महाराष्ट्र हे साहित्यिक उत्कृष्टतेचे माहेरघर आहे आणि मराठी भाषा दिन हा मराठी साहित्याला समृद्ध करणाऱ्या दिग्गजांचा गौरव करण्याचा आणि साजरा करण्याचा दिन आहे. कुसुमाग्रजानी मराठी भाषेला ज्ञानपीठ मिळवून दिले. कुसुमाग्रज यांचे साहित्यातील योगदान खूप मोठे आहे. त्यानिमित्ताने मराठी भाषेचा गुणगौरव करणे हे मराठी भाषिक म्हणून आपले कर्तव्य ठरते. असे प्रतिपादन प्रा. सौ. कांचन थोरात यांनी केले. त्या श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ कराडचे वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड येथे मराठी विभाग आयोजित ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज जयंती व मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने आयोजित व्याख्यान प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व विद्यार्थांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मराठी विभाग प्रमुख प्रा. एस. एस. बोंगाळे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा.व्ही.आय.आंबेकरी यांनी करून दिली तर आभार प्रा.के.एस.महाले यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.ए.एम.मुजावर यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी कु. अक्षता सुतार आणि कु. शेजल कदम यांनी लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी हे गीत सादर केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

Scanned with CamScanner